अत्यंत महत्वाचे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
क्रमांक : लेखा/२२/कावि/२८७२/२०२३
दिनांक :- २८/०८/२०२३

**विषय – लेखापरिक्षणासाठी रेकॉर्ड उपलब्ध करून देणेबाबत**

**परिपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व विभागांना या परिपत्रकाद्वारे सुचित करणेत येते की, महानगरपालिकेचे मुख्य लेखापरिक्षण विभागातून प्रत्येक वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण होत असते तथापि माझे असे निदर्शनास आले आहे की, संबंधित विभागाकडून लेखापिरक्षणास आवश्यक ते रेकॉर्ड वेळेत उपलब्ध करून देण्यात येत नाही. यापुर्वी वेळोवेळी परिपत्रके काढूनही विभागांकडून कार्यवाही होत नसलेचे दिसून येते. त्यामुळे त्यासंदर्भात तक्रारी प्राप्त होत आहेत. यास्तव सन १९८२- ८३ ते सन २०१६ -१७ या कालावधितील रेकॉर्ड लेखापरिक्षणाकामी त्वरीत उपलब्ध करून देणेत यावे. रेकॉर्ड विहित मुदतीत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी विभागावर आहे. लेखापरिक्षणास रेकॉर्ड उपलब्ध न केलेने आक्षपाधीन रकमा मोठ्या प्रमाणात ठेवल्या जातात. सदरची बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे. रेकॉर्ड उपलब्धतेत दिरंगाई झालेस व त्यामुळे लेखापरिक्षण करता न आलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शाखा प्रमुखाची राहिल व सदरची बाब मा.आयुक्तसो, यांचे निदर्शनास आणून देणेत येईल याची नोंद घ्यावी.

उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८

प्रति,
सर्व संबंधित विभाग